आयसीटी योजना (तिसरा टप्पा) अंमलबजावणी संदर्भात
आय.एल.अँङ.एफ्.एस्. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस
लि. या संस्थेस निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः आयसीटी २०१४/प्र.क्र.२५ भाग-१/एस.डी-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई
दिनांक: ३१ मार्च, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. २५/०३/२०१३
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि.०७/११/२०१३
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र. २५/एस.डी.१, दि.२६.०३.२०१४
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र. २५/एस.डी.१, दि.२८.०५.२०१४
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(२)/एस.डी.१, दि.३०/०७/२०१४
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१,दि.०५/०२/२०१५
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१,दि.०५/०३/२०१५
८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. ११/९/२०१५
९) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : आयसीटी २०१५/प्र.क्र.१२५/एसडी.१, दि.२१/९/२०१५
१०) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१,दि.१५/०१/२०१६
११) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. ३०/०३/२०१६
१२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. ०८/०६/२०१६
१३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. २०/१०/२०१६
१४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. २७/१०/२०१६
१५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. १७/०१/२०१७
१६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. १६/०३/२०१७
१७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८/०४/२०१७ व दि.०६/०२/२०१८
१८) केंद्र शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली आदेश क्रमांक : F.No-11-25/2011-Sch.5(GEN), F.No-11-25/2011-Sch.5(SC), F.No-11-25/2011-Sch.5(ST), दि.३०/०८/२०१७
१९) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. ३१/०८/२०१७
२०) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. १४/११/२०१७
२१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : आयसीटी २०१४/प्र.क्र.२५(१)/एस.डी.१, दि. २०/०३/२०१८
२२) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांचे पत्र क्र.रामाशिअ/आयसीटी/टप्पा-३/IL&FS-१३६०_७&४/२०१७-१८/(०९/१८)/४४९, दिनांक ३१/०३/२०१८

प्रस्तावना -

राज्यात केंद्र पुरस्कृत माहिती तंत्रज्ञान व दळणवळण (Information & Communication Technology) योजनेचा तिसरा टप्पा ५००० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यास शासनाच्या संदर्भाधिन

दि.२५/०३/२०१३ आणि दि.०७/११/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना BOOT तत्वावर राबविण्यात येत असून यासाठी निविदा प्रक्रियेव्दारे ५ वर्षासाठी BOOT तत्वावर प्रतिशाळा रुपये १७.९० लक्ष एवढया दराने योजना राबविण्यासाठी दोन ऑपरेटर्सची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या योजनेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या दोन ऑपरेटर्सपैकी आय.एल.अँङ.एफ्.एस्. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लि. या संस्थेस दि. २५/०३/२०१३ च्या शासन निर्णयान्वये २५६० शाळा आणि दि.०७/११/२०१३ च्या शासन निर्णयान्वये १५९० शाळा मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

आय.एल.अँङ.एफ्.एस्. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लि. या ऑपरेटरला दि.०७/११/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या १५९० शाळांपैकी १३०० शाळांच्या सातव्या आणि ६० शाळांच्या चौथ्या सहामाहीकरीता अदा करावयाची रक्कम रु.१२,१७,२०,०००/- मधून अहवाल प्राप्त झालेल्या शाळांची दंडात्मक रक्कम, अहवाल प्राप्त न झालेल्या शाळांची रक्कम व MHRD कडून निधी प्राप्त न झालेल्या शाळांची रक्कम रु.३,३७,११,०००/- वजा करुन उर्वरित रुपये ८,८०,०९,०००/- निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानामार्फत दि.३१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे. यानुषंगाने सन २०१७-१८ साठी उपलब्ध निधी विचारात घेऊन रु.२०,४९,९५०/- (रुपये वीस लाख एकोणपन्नास हजार नऊशे पन्नास फक्त) इतका निधी आय.एल्.अँड एफ्.एस. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लि. यांना वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> -

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी आय.एल.अँङ.एफ्.एस्. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लि. शी केलेल्या करारनाम्यातील मुद्दा क्र. ७.१ (ii) नुसार ५०% निधी पाच वर्षामध्ये विभागणी करुन प्रति सहामाही ५% निधी याप्रमाणे ऑपरेटरला अदा करण्याची तरतूद करण्यात आली आहे. यानुसार आय.एल.अँड.एफ्.एस्. एज्युकेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लि. या संस्थेला दि.०७/११/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या १५९० शाळांपैकी १३०० शाळांच्या सातव्या सहामाहीच्या व ६० शाळांच्या चौथ्या सहामाहिच्या देय रकमेपैकी रु.२०,४९,९५०/- (रुपये वीस लाख एकोणपन्नास हजार नऊशे पन्नास फक्त) इतका निधी वितरीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ८०० इतर खर्च, (००) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (००) (०७) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान योजना कार्यान्वित करणे (केंद्र हिस्सा) (२२०२ ३७९१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षातंर्गत रु.१००००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. यामधून रु.२०,४९,९५०/- (रुपये वीस लाख एकोणपन्नास हजार नऊशे पन्नास फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

३. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद अनुक्रमांक ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील १, २, ३,४,५, ६ व ७ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत. परिपत्रकातील परिच्छेद-१८ नुसार केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाला असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.३९७/अर्थोपाय, दि.१४/०९/२०१७ अन्वये दिलेले आहेत.

४. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ व दि.०६/०२/२०१८ रोजीच्या परिपत्रकातील सूचना नुसार करण्यात यावा. यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व सह सचिव (प्रशासन) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.१८/०४/२०१७ व दि.०६/०२/२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये, वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.३९७/अर्थोपाय, दि.१४/०९/२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११८१६४८०२२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2018.03.31 21:16:25 +05'30'

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

६) राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, चर्नीरोड, मुंबई

७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र½, मुंबई, नागपूर

८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र½, मुंबई / नागपूर

९) सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

१०) संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३

११) अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१२) सर्व वरिष्ठ लेखापरीक्षक (शिक्षण विभाग)

१३) कक्ष अधिकारी / अवर सचिव (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

१४) वित्त विभाग (व्यय-५)/नियोजन विभाग

१५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अर्थसंकल्प कार्यासन

१६) निवड नस्ती, एसडी-१